कृषी उत्पन्न बाजार समिती
अमरावती

कृषि उत्पन्न बाजार समिती अमरावती



वार्षिक अहवाल

२०२५-२६



अभिवादन





मा. हरिष एकनाथराव मोरे

सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.



मा. भैय्यासाहेब धनराज निर्मळ

उपसभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.

सन्माननिय संचालक मंडळ



मा.प्रताप पं. भुयार
संचालक



मा.किशोर ओं. चांगोले
संचालक



मा.आशुतोष मा.देशमुख
संचालक



मा.ज्ञानेश्वर उर्फ नाना दा. नागमोते
संचालक



मा.सौ. रेखा प्र. कोकाटे
संचालिका



मा.सौ.अलका शि.देशमुख
संचालिका



मा.सतिश रा. गोटे
संचालक



मा.प्रकाश बा. काळबांडे
संचालक



मा.प्रविण पं. अळसपुरे
संचालक



मा.श्रीकांत छ. बोंडे
संचालक



मा.मिलींद श्री. तायडे
संचालक



मा.राम बा. खरबडे
संचालक



मा.राजेश रा. पाटील
संचालक



मा.प्रमोद सु. इंगोले
संचालक



मा.बंडू गु. वानखडे
संचालक

अधिकारी वृंद



मा. राजेश भुयार
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था.अम.



दिपक विजयकर
सचिव, कृ.उ.बा.स. अम.



भुजंग डोईफोडे
सहा. सचिव, कृ.उ.बा.स. अम.



प्रविण पवार
सहा.सचिव, कृ.उ.बा.स.अम.



किसन मोरे
लेखाधिकारी कृ.उ.बा.स. अम.

कृषि उत्पन्न बाजार समिती,अमरावती

विलास नगर रोड, अमरावती, ४४४६०४
दूरध्वनीक्रमांक (कार्यालय) (०७२१) २५७२०२४ / २५७२१७८
E-mail-am_amarawati@msamb.com

जावक क्र. ४५५ कृ.उ.बा.स.अम./२०२६-२७ **दिनांक – ०३/०९/२०२६**

(वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस)

सन २०२५-२६ (कलम २७ (अ) मध्ये आमंत्रीत केलेल्या सभासदांकरीता)

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम २७ (अ) मध्ये नमुद केलेल्या सदस्य व आमंत्रीत सदस्यांना कळविण्यात येते की, बाजार समितीची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१९/०९/२०२६ (शनिवार) रोजी सकाळी ११.०० वाजता विषय सुचीतील विषयांचे विचारविनीमयार्थ सभा आयोजीत करण्यात आलेली आहे, तरी आपण सभेमध्ये वेळेवर सहभागी व्हावे ही विनंती, सभेतील विषय खालील प्रमाणे-

दिनांक	-	**१९/०९/२०२६**	**दिवस –शनिवार**
सभेकरीता स्थळ	-	**बाजार समितीचे टि.एम.सी यार्ड चे प्रांगणात**	
वेळ	-	**सकाळी ११.०० वा.**	

विषय क्र. १ - मागील दि.२७/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणेबाबत.

विषय क्र. २ - सन २०२५-२६ चे जमा खर्च पत्रक व ताळेबंदावर चर्चा करुन मंजुर करणे.

विषय क्र. ३ - सन २०२४-२५ चे अंकेक्षण टिपणी बाबत.

विषय क्र. ४ - सन २०२५-२६ चे वार्षिक अहवालावर चर्चा करणे.

विषय क्र. ५ - मा. सभापती महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

-स्वा-
(दिपक विजयकर)
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती

प्रति,

मा. श्री. ----------

सुचना :-

१) वरील नोटीसमध्ये नमुद केलेल्या सभेसाठी गणपुर्ती (कोरम) न झाल्यास ही सभा १ तासासाठी तहकुब करुन १ तासानंतर घेण्यात येईल व ह्या सभेला गणपुर्ती (कोरम) नसला तरी नोटीस मधील विषयावर चर्चा केली जाईल.

२) कोणत्याही सभासदास या संस्थेचे कामकाज बाबत काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि.११/०९/२०२६ पर्यत (सभेचे ८ दिवस अगोदर) मिळतील अशा बेताने संस्थेचे सचिवांकडे पाठविणे आवश्यक आहे.

३) सभेस येणारे प्रतिनिधीस आपले संस्थेचे/ ग्रामपंचायतचे सचिवांचे स्वाक्षरीनिशी पत्र सोबत आणावे त्या शिवाय सभेत प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

-स्वा-
(दिपक विजयकर)
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.

अमरावती कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.

कार्यरत समितीचे संचालक मंडळ.

अ.क्र.	संचालकाचे नाव	पद	मतदार संघ	मतदार संघ
१	मा. श्री. हरिष एकनाथराव मोरे	सभापती	मु.नांदुरा पो. सालोरा, ता.जि. अम.	सेवा सहकारी संस्था
२	मा. श्री. भैय्यासाहेब धनराज निर्मळ	उपसभापती	मु.पो.पिंपळविहीर ता. जि. अमरावती	सेवा सहकारी संस्था
३	मा. श्री. प्रताप पंजाबराव भुयार	संचालक	मु.पो. ब्राम्हणवाडा (गो) ता.जि. अम.	सेवा सहकारी संस्था
४	मा.श्री. किशोर ओंकारराव चांगोले	संचालक	चिंचखेड पो. डवरगाव ता. जि.अम.	सेवा सहकारी संस्था
५	मा. श्री. आशुतोष मार्तंडराव देशमुख	संचालक	मु.पो. खोलापुर ता. भातकुली जि.अम.	सेवा सहकारी संस्था
६	मा.श्री. ज्ञानेश्वर उर्फ नाना दादारावजी नागमोते.	संचालक	भातकुली ता.भातकुली जि.अमरावती	सेवा सहकारी संस्था
७	मा. सौ. रेखाताई प्रकाशराव कोकाटे	संचालीका	मु.धानोरा कोकाटे पो. ब्राम्हणवाडा गो ता.जि. अमरावती.	सेवा सहकारी संस्था
८	मा. सौ. अलकाताई शिवाजीराव देशमुख	संचालीका	C/O शिवाजीराव देशमुख, साई संगम अपार्टमेंट, रुख्मीनी नगर, अमरावती	सेवा सहकारी संस्था
९	मा. श्री. सतीश रामदासजी गोटे	संचालक	मु. रोहणखेडा पो. देवरा ता.जि.अमरावती	सेवा सहकारी संस्था
१०	मा.श्री. प्रकाश बाबाराव काळबांडे	संचालक	मु. पो. कठोरा ता. जि. अमरावती	सेवा सहकारी संस्था
११	मा. श्री. प्रविण पंढरीराव अळसपुरे	संचालक	गजानन टाऊनशिप, कठोरा बु. ता जि. अमरावती	ग्रामपंचायत
१२	मा. श्री. श्रीकांत छगनराव बोंडे	संचालक	मु.पो. साऊर ता. भातकुली जि. अमरावती	ग्रामपंचायत
१३	मा.श्री. मिलींद श्रीरामजी तायडे	संचालक	मु.पो.शिराळा ता. जि.अमरावती	ग्रामपंचायत
१४	मा. श्री. राम बापुराव खरबडे	संचालक	मु.पो. आष्टी ता. भातकुली जि. अम.	ग्रामपंचायत
१५	मा. श्री. राजेश रामदासजी पाटील	संचालक	तारांगण नगर, शेगांव नाका, अमरावती	अडते / व्यापारी मतदार संघ
१६	मा.श्री. प्रमोद सुरेंद्र इंगोले	संचालक	भाजीबाजार, खरकाडीपुरा, ता.जि.अमरावती	अडते / व्यापारी मतदार संघ
१७	मा.श्री. बंडु गुलाबराव वानखडे	संचालक	चौरे नगर, अमरावती	हमाल व तोलारी मतदार संघा
१८	मा.जिल्हा/तालुका उपनिबंधक सह.संस्था,अम.	सदस्य	अमरावती	कलम १३ (फ) प्रमाणे
१९	श्री. दिपक केशवराव विजयकर	सचिव/ सदस्य	कृ.उ.बा.स.अम.	कलम १३ (ग) प्रमाणे.

-स्वा-

(दिपक विजयकर)

सचिव

कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.

प्रस्तावना

प्रिय शेतकरी बंधु तसेच अमरावती व भातकुली सेवा सहकारी संस्था सदस्य/ प्रतिनीधी व ग्रामपंचायत सदस्य/ प्रतिनीधी तसेच अडते/ खरेदीदार प्रतिनीधी व कामगार प्रतिनीधी यांचे आजच्या २३ वी वार्षीक सर्वसाधारण सभेत आपले स्वागत आहे.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी व योग्य वजन माप करणे तसेच आवश्यक त्या सर्व सुविधा बाजार आवारामध्ये बाजार आवारांच्या विविध घटकांमार्फत पुरविण्याच्या उदात्त हेतुने कृषि उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाली. बाजार समितीला प्राप्त होणारे वैभव हे बळीराजाच्या कष्टाचे आणि काळ्या मातीत जिरलेल्या त्याच्या घामाचे सुगंधित प्रतिक आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्री आणि तदनुषंगिक सर्व सुविधा कमी वेळेमध्ये पुरविण्याचा आमच्या बाजार समितीचा मानस आहे. बाजार आवारामध्ये स्वच्छता, आवार सुशोभिकरण, विद्युत पुरवठा, प्रशस्त रस्ते, माल साठवणुकीची भव्य क्षमता, पारदर्शक व्यवहार, स्वच्छ प्रशासन या सर्व गोष्टी राबविण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.

पश्चिम विदर्भातील उच्चतम आणि नामांकित असणाऱ्या अमरावती कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये गत काही दिवसात शेतकऱ्यांकरीता SMS व्दारे विनामुल्य बाजारभाव तथा धान्य चाळणी यंत्राद्वारे माफक दरात धान्य सफाई, तसेच बाजार समितीचे उत्पन्नात वाढ, अद्यावत सी.सी.टि.व्ही. कॅमेरा यंत्रणेव्दारे नियंत्रण करुन शेतमालाचे संरक्षण, ८० मे. टनी व १०० मे.टनी नविन इलेक्ट्रॉनिक्स वजन काट्याचे इंस्टॉलेशन, माफक दरात शेतकऱ्यांना भोजन व्यवस्था करण्यात आलेली आहे व शासनाच्या ई-नाम योजनेद्वारे संगणकीय प्रणालीव्दारे शेतकऱ्यांच्या शेतमालाची खरेदी-विक्री करण्यात येत आहे. समितीचे धान्य बाजार आवारात २.५ लक्ष क्विंटल साठवणुक क्षमता असलेले शेडचे बांधकाम झालेले आहे. या शेडमध्ये शेतकऱ्यांचा एका वेळेस किमान २० ते २५ हजार क्विंटल शेतमाल हर्रास करण्याकरीता शेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

धान्य बाजार आवारात अडते / खरेदीदार/ हमाल कामगार व शेतकरी व इतर सर्व घटकांना पिण्याचे व वापराचे पाण्याचे सुविधे करीता ५० हजार लिटर पाण्याचे टाकीचे बांधकाम पुर्णत्वास आलेले आहे. या व्यतीरीक्त प्रकाश व्यवस्था विस्कळीत होऊ नये या करीता १२५ KV चे जनरेटर चे इंस्टॉलेशन करुन कार्यान्वीत झालेले आहे. तसेच यार्डमधील हायमास्ट फ्लड लाईट तसेच शारदा माता शेड व टि.एम.सी शेडमध्ये लाईट व्यवस्था करुन संपुर्ण यार्डची अंडर ग्राऊंड वायरींगचे काम करण्यात आलेले आहे.

याचे सर्व श्रेय या कृषि उत्पन्न बाजार समितीला भरभराटी देणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला त्याच बरोबर शेतकऱ्याच्या शेतमालाचे अचूक मोजमाप करणाऱ्या अडते/व्यापारी/ बांधवांना कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आज पर्यंतच्या सर्व शेतकरी प्रतिनिधी आणि सर्व संचालक मंडळीना या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्व हमाल, मापारी बांधवांना या बाजार आवाराच्या आणि शेतकरी विचारधारेच्या सर्व शुभचिंतकांना, सर्व अधिकारी आणि

कर्मचारी वृंदाना तसेच शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून बाजार आवारात शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी वेळोवेळी पाठपुरावा करणाऱ्या धीरोदात्त आणि लोकहितदक्ष प्रतिनिधींना जाते.

आगामी काळामध्ये समितीचे फळे व भाजीपाला यार्ड येथे अद्यावत फळे व भाजीपाला मार्केट बांधकाम प्रकल्पास शासकीय तांत्रीक मंजुरात घेण्यास सुरुवात करण्यात आलेली असुन लवकरच हा महत्वकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण करण्याचा मानस आहे. फळे व भाजीपाला विभागातील ओल्या कचऱ्यापासून कंम्पोस्ट आणि गांडुळ खत बनविण्याचे प्रकल्प, शेतमालाच्या साठवणूकीकरीता गोदाम व्यवस्थेबरोबरच शितगृह उभारणी, बारदाना तथा फुलांचे बाजाराचे अधिकृतरित्या नियमन करण्यात येणार आहे. तसेच केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेद्वारे संगणकीय प्रणालीव्दारे शेतकऱ्यांच्या शेतमालाची विक्री व ऑनलाईन पेमेंट करण्यात येत आहे.

एकंदर शेतकऱ्यांना केंद्रबिंदु मानून काम करण्याचे मानस आम्ही अंगिकरण्याचा आणि बनवण्याचा निर्धार केला आहे. समस्यांचे निराकरण करण्याकरीता बाजार आवाराशी निगडीत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सर्व आदरणीय थोर घटकांचा पाठींबा आणि सहकार्य लाभावे हिच सदिच्छा.

-स्वा-
(हरिष एकनाथराव मोरे)
सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती

बाजार समितीने केलेल्या सुविधा :-

बाजार समिती मार्फत शेतकऱ्यांकरीता आवश्यक असणाऱ्या सुविधांमध्ये बाजारभावाची माहिती शेतकऱ्यांना देण्याचे दृष्टिने SMS सुविधा विनामुल्य शेतकऱ्यांना पुरविले जातात. ताडपत्रीची व्यवस्था सुध्दा बाजार समितीने केलेली आहे. तसेच अद्यावत टिन शेड, जनरेटर, अडते/ खरेदीदार करीता दुकाने, शिदोरी गृह, सुलभ शौच्छालय, वाटर कुलरव्दारे थंड पिण्याचे पाण्याच्या व्यवस्था, शेतकऱ्याना माफक दरात भोजन व्यवस्था सुविधा, शेतकऱ्यांच्या शेतमालाचे चोरी पासुन संरक्षणाकरीता सी.सी.टी.व्ही कॅमेरा यंत्रणाव्दारे नियंत्रण केले आहे. तसेच तारण कर्ज योजने अंतर्गत दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ पर्यंत १६६ शेतकऱ्यांना रु.१,६४,४०,०००/-तारण कर्ज वाटप केलेले आहे.

भविष्यकालीन योजना :-

१) शेतमाल तारण योजने अंतर्गत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कर्ज वाटप करण्याचा मानस आहे. सब यार्डवर तारण गोदाम साठवणुक क्षमता वाढविण्यात येईल.

२) ई-नाम योजने अंतर्गत १००% ई-गेट एंन्ट्री, ई ऑक्शन, ई पेमेंटची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

३) फळ, भाजीपाला व बडनेरा यार्डवर इलेक्ट्रॉनीक्स वजन काटा बसविण्याचा मानस आहे, फळे भाजीपाला विभागात संपुर्ण यार्डचे बांधकाम त्यामध्ये अडत्यांकरीता दुकाने, मोठे शेड व काँक्रीटीकरण करण्याचा मानस बाजार समितीचा आहे.

४) धान्य बाजार आवारातील उर्वरित राहीलेले कॉक्रीटीकरण तसेच नादुरुस्त असलेले काँक्रीटीकरणाचे काम करण्यात येणार आहे.

५) धान्य बाजार आवार तथा फळे व भाजीपाला विभागात सौरउर्जा प्रकल्प राबविण्याचा मानस आहे.

६) समितीचे फळे व भाजीपाला विभागातील कर्मशिअल कॉम्पलेक्स वरील दुसऱ्या मजल्याचे बांधकाम व फळे विभागातील दुकानांचे वर पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्यात येणार आहे.

७) शिराळा उपबाजार येथे कंपाऊंड वॉल व कमर्शिअल कॉम्पलेक्स,अद्यावत प्रशासकीय इमारत, गोदामचे बांधकाम करण्यात येणार आहे.

८) भातकुली, खोलापुर उपबाजार आवारात गुरांच्या बाजाराचे नियमन तथा शेतकऱ्यांकरीता पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

९) अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कृषी मालाच्या खरेदी-विक्रीची वाढती उलाढाल तसेच शेतकरी व व्यापाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेता आधुनिक व विस्तृत बाजार सुविधांची आवश्यकता निर्माण झाली आहे. सध्याच्या उपलब्ध जागेवर सर्व आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे मर्यादित होत असल्याने अतिरिक्त जागेची आवश्यकता भासत आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली शासकीय जमीन नाममात्र रु.१/- दराने कब्जेहक्काने प्रदान करण्याबाबत धोरण निश्चित केलेले आहे. अमरावती शहराच्या मध्यवस्तीत असलेली मोसीकॉल परिसरातील २५ एकर पैकी अंदाजे १५ एकर मोसीकॉलची शासनाचे अखत्यारीत असलेली जमीन ही बाजार समितीच्या भविष्यातील विकासासाठी तसेच कृषी मालाच्या नियमनबद्ध बाजार व्यवस्थेसाठी अत्यंत उपयुक्त असून सदर ठिकाणी आधुनिक कृषी बाजार संकुल, शेतकरी सुविधा केंद्र, गोदामे, व्यापारी गाळे, वाहतूक व पार्किंग व्यवस्था तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे शक्य होणार आहे. सदर

सुविधा उपलब्ध झाल्यास अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी मालासाठी अधिक सुलभ, पारदर्शक व सुसज्ज बाजार व्यवस्था उपलब्ध होईल आणि कृषी व्यापार व्यवस्थेला चालना मिळेल

-स्वा-

(हरिष एकनाथराव मोरे)
सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती

अमरावती कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.

वार्षिक अहवाल

सन २०२५-२६

अमरावती कृषि उत्पन्न समितीचा सन २०२५-२६ वर्षाचा अहवाल आपणासमोर सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. प्रथमत: प्रास्ताविक भूमिका विषद करून अहवालास सुरुवात करीत आहो.

कृषक आणि कृषि हा राष्ट्राचा आधार स्तंभ असून त्यांच्या विकासात ह्या संस्थेचा असलेला सहयोग आणि संस्थेने केलेले कार्य या अहवाल रूपाने सादर करीत आहे. शेतकरी वर्ग हा सद्यातरी स्वयंपूर्ण झालेला नसून त्यांच्या उत्पादीत शेतमालाला योग्य किंमतीचा आधार प्राप्त झाल्याशिवाय इतर विकसीत वर्गाच्या तुलनेत यथायोग्य जीवन जगणे शक्य होणार नाही. शेतीमालाचे विपणन व्यवस्थेत असलेले दोष कमी करण्याचे दृष्टीने बाजार समित्या मार्फत प्रयत्न केले जात आहेत. शेतीमाल उत्पादकास योग्य तोल व मोल मिळावा, त्याने शेतमाल विकावयास आणले नंतर त्याची अडवणूक व फसवणूक होवू नये हे बाजार समितीचे कर्तव्य आहे.

या बाजार समितीची स्थापना सन १६ फेब्रुवारी १८७२ साली झाली असे उपलब्ध अभिलेखावर नमुद आहे. १८९७ साली बेरार कॉटन अँड ग्रेन मार्केट अॅक्ट अंमलात आला. सन १९३७ पासून वऱ्हाड प्रांताला सि.पी. कॉटन मार्केट अॅक्ट लागू करण्यात आला. सन १९५६ साली धान्य बाजार समिती सि.पी. अॅन्ड बेरार अॅग्रीकल्चर प्रोड्युस मार्केट चे कायद्यान्वये कापूस बाजार व धान्य बाजाराचे एकत्रिकरण होवून २० एप्रील १९७१ ला कृषि उत्पन्न बाजार समिती अमरावती अस्तित्वात आली. या कायद्याचे आधारे शेतकऱ्यांचे उत्पादीत मालाचे नियमन करून त्यांना योग्य भाव, वजन करण्याकरीता कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ, सेवकवर्ग, खरेदीवर, अडते, मापारी, हमाल, कामगार व मदतनिस इत्यादींचे परस्पर सहयोगाने शेतकरी समाजाची शक्य तितकी सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे व करीत आहे तो आपले अवलोकनार्थ सादर करीत आहे.

ह्या समितीचे अमरावती व भातकुली तालुक्याचे कार्यक्षेत्रातील शेती प्रामुख्याने काळी कसदार असून, सोयाबिन, तूर, कापुस, हरभरा व भुईमुंग ही प्रमुख पिके आहेत, याशिवाय करडी, तिळ, जवस, सुर्यफुल, मुंग, उडीद, ज्वारी, गहू इत्यादी पिके सुध्दा घेतली जातात.

या बाजार समितीचे, अमरावती तालुका व भातकुली असे दोन तालुक्याचे कार्यक्षेत्र आहे. तसेच या समितीचे खालील प्रमाणे उपबाजार आहेत.

अ.क्र	बाजार आवार	क्षेत्रफळ
१	धान्य बाजार आवार	१८ एकर १७ गुंठे
२	फळे व भाजीपाला आवार	८ एकर १४ गुंठे
३	टि. एम. सी. आवार	५ एकर १० गुंठे
४	बडनेरा उपबाजार (धान्य)	४ एकर ३ गुंठे
५	बडनेरा गुंराचा बाजार	५ एकर
६	भातकुली उपबाजार	९ एकर १३ गुंठे
७	शिराळा उपबाजार	७ एकर ३ गुंठे
८	आष्टी उपबाजार	८ एकर
९	भाजीपाला उपबाजार (भातकुली रोड)	३ एकर २७ गुंठे
१०	खोलापुर उपबाजार	८ एकर
११	माहुली (जहाँगीर) उपबाजार	८ एकर
१२	नांदगांव पेठ (ग्रामीण गोदाम)	१ एकर

कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती

या समितीने शेतकऱ्यांचे सोईकरीता, समितीचे धान्य बाजार आवार येथे १०० टनी, ८० टनी इलेक्ट्रॉनिक वजन काटा बसविला आहे सदर काट्यावर शेतकऱ्यांचे शेतमालाचे वजन मापा करीता कोणताही मोबदला न घेता शेतकऱ्यांना मोफत वजनमाप करून देण्यात येत आहे. शेतमाल चाळणी करणे करीता गाळणयंत्राची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. समितीने शेतकऱ्यांना विनामुल्य SMS व्दारे बाजार भावाची दैंनदिन माहिती पुरविण्यात येत आहे.

बाजार समितीने ७० हजार चौरस फुट आकाराचे शारदा माता मंदिरासमोर भव्य टिनशेड तसेच टि.एम.सी यार्डवर सुध्दा भव्य टिनशेड उभारण्यात आलेले आहे. नविन संचालक मंडळाचे कालावधीत धान्य गाळण यंत्रा समोरील तसेच ६०० मे. टन गोडावुन समोरील भव्य टिनशेड बांधकाम पुर्ण झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे नैसर्गीक आपत्तीपासुन संरक्षण होत आहे. सद्यस्थितीत विविध बांधकामा अंतर्गत शारदा माता शेडमधील काँक्रीटचे काम पुर्ण झालेले आहे व त्याचा लिलावाकरीता वापर होत आहे.

समितीचे कार्यक्षेत्रात बागायती क्षेत्र असल्यामुळे शेतकरी बऱ्याच प्रमाणात फुलशेती करीत आहे. अशा शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा या करीता धान्य बाजार आवाराचे टि.एम.सी यार्ड लगत जागेवर फुलांचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्या करीता जागा उपलब्ध करूण देण्यात आलेली आहे. या करीता बाजार समितीने फुलांचे नियमन करण्याचा प्रस्ताव शासनाने मंजुर केलेला आहे. तसेच मा. पणन संचालक, यांचे कडे खुले प्लॉट वाटप करण्याचा प्रस्ताव मंजुरातीस सादर केलेला आहे. मंजुरात प्राप्त झाल्यावर लवकरच फुल बाजाराचे नियमन करुन फुल बाजार चालु करण्यात येणार आहे. तसेच फुलशेती करण्याऱ्या व इतर उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनी तळेगांव दाभाडे येथील प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा.

१. **<u>विनामुल्य एस.एम.एस. सुविधा :-</u>** या बाजार समितीमध्ये प्रथमच शेतकऱ्यांना दैनिक बाजार भावांची माहितीचा एस.एम.एस. मोबाईलव्दारे विनामूल्य सेवा पुरविली जात आहे. हि सेवा दि.१४/०९/२०१४ पासुन नियमित आजतागायत शेतकऱ्यांना पुरविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दररोजचे बाजार भावाची माहिती मिळत असल्याने त्याचा फायदा होत आहे.

२. **<u>विनामुल्य ताडपत्री सुविधा :-</u>** शेतकऱ्यांचा शेतमाल यार्डवर आल्यानंतर पावसामुळे ओला होऊ नये याकरीता शेतकरी/ अडत्यांना समिती मार्फत विनामुल्य ताडपत्री पुरविण्यात येते.

३. **<u>खुल्या ओट्यावर (प्लॅट फॉर्मवर) अद्यावत टिनशेडचे बांधकाम :-</u>** केंद्र शासनाचे बळकटीकरण प्रतवारी व संरचना ह्या योजने अंतर्गत समितीने धान्य यार्डवर ओपन प्लॅटफार्म वर भव्य टिन शेड उभारले तसेच इंटरनल रोड्स व रीटेनींग वॉलचे बांधकाम पुर्ण झालेले असुन शेतकऱ्यांच्या शेतमालाचा हर्रास करणे करीता या माध्यमातुन चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. या व्यतीरीक्त टि.एम.सी यार्डमध्ये अद्यावत पि.ई.बी शेडचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच गाळणयंत्रासमोरील शेडसुध्दा पुर्ण झाले आहे.

४. **<u>गोदाम व्यवस्था :-</u>** ग्रामीण गोदाम योजने अंतर्गत समितीने शिराळा, आष्टी, भातकुली, खोलापुर व नांदगाव पेठ येथे प्रत्येकी २०० मे.टन क्षमतेचे गोदामाचे बांधकाम करण्यात आले आहे व एम.ए.सी.पी प्रकल्पा अंतर्गत धान्य बाजार आवार येथे १२०० मे.टन व १४०० मे.टन, ६०० मे.टन क्षमतेचे गोदाम उभारण्यात आलेले आहे. सदर गोदामाचे साठवणुक क्षमता वाढल्यामुळे बाजार समिती स्वनिधीतुन शेतमाल तारण योजन राबवित आहे.

५. **<u>जनरेटर सुविधा :-</u>** भारनियमामुळे विद्युत पुरवठा बंद कालावधीत समितीचे जनरेटरव्दारे विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. भारनियमन काळात किंवा विद्युत पुरवठा बंद कालावधीत निर्माण होत असलेल्या अडचणीचे निराकरण होत आहे. या व्यतीरिक्त शासकीय अनुदानावर व बाजार समितीच्या स्वनिधितुन सौरउर्जा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

६. **सुलभ शौचालय सुविधा :-** समितीचे जुने यार्ड व नविन यार्ड येथे शेतकऱ्यांच्या सोईसाठी सुलभ शौचालये बांधण्यात आलेले आहे.

७. **शेतमाल तारण योजना सुविधा -** सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात समितीने शेतमाल तारण योजने अंतर्गत १६६ शेतकऱ्यांचा ५७५१.२३ क्विंटल शेतमाल तारण योजनेत ठेवलेला असुन शेतकऱ्यांना रु.**१,६४,४०,०००/-**चे समितीचे स्वनिधीतुन अग्रीम राशी (तारण कर्ज) वितरीत करण्यात आलेली आहे. तारण योजणा राबविण्याचे दृष्टिने बाजार समितीने १२ गोदामाचे बांधकाम केले आहे एकुण क्षमता ५२०० मे.टन आहे. सदर योजनेचा शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत				
अ.क्र.	**शेतमाल प्रकार**	**शेतकरी संख्या**	**शेतमाल वजन (क्विंटलमध्ये)**	**तारण वाटप (रुपयात)**
१	**सोयाबीन**	७४	२८५३.१२	५४,३४,०००/-
२	**तुर**	९०	२८००.०१	१,०७,७७,०००/-
३	**हरभरा**	२	९८.१०	२,२९,०००/-
एकुण		**२५८**	**५७५१.२३**	**१,६४,४०,०००/-**

८. **अडत्या - व्यापाऱ्यांकरीता नवीन दुकाने सुविधा :-** समितीचे धान्य यार्डवर पार्किंग पेव्हमेंटचे समोरील कम्पाऊंड वॉलला लागुन नवीन ५० गाळे व इतर १८ मोठे गाळे बांधण्यात आले असुन अडते खरेदीदार यांना वितरीत करण्यात आले. त्यामुळे दैनंदिन कामकाज सुरळीत होण्यास मदत झालेली आहे. तसेच नव्याने बांधकाम सुरु असलेल्या इमारतीमध्ये अडते / व्यापाऱ्यांकरीता दुकाने बांधकाम सुरु आहे. बांधकाम पुर्ण झाल्यावर आतील गाळे अडत्यांना वाटप करण्यात येईल.

९. **बडनेरा उपबाजार धान्य यार्डवर व्यवहार सुरळीत सुरु :-** समितीचे उपबाजार पेठ बडनेरा येथील धान्य यार्ड बरेच दिवसांपासुन बंद पडलेले होते. सदर ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असुन धान्य यार्ड पूर्ववत सुरु करण्यात आले आहे. सद्यस्थितीमध्ये धान्य यार्डवर शेतकऱ्यांच्या शेतमालाची आवक येत असुन लायसन्सधारक अडते, व्यापारी व कामगारांमार्फत व्यवहार सुरळीत सुरु आहे. त्या ठिकाणी संपुर्ण बाजार आवाराला संरक्षण भिंत बांधण्यात आलेली आहे तसेच लिलावा करीता काँक्रीटीकरण करुन देण्यात आलेले आहे. सोबतच अडते/व्यापारी करीता गाळे बांधकाम पुर्ण झालेले असुन लवकरच वितरीत करण्यात येणार आहे. तसेच धान्य बाजार यार्डवर रेशीम बाजार सुरु केलेले आहे.

१०. **मातेरा पध्दत बंद** :- समितीचे यार्ड मध्ये पुर्वापार चालत आलेली मातेरा नेण्याची पध्दत दि. ०७-०३-२००७ पासून पुर्णत: बंद करण्यात आलेले असून त्याऐवजी स्त्री कामगारांना रु. १/- प्रती क्विंटल प्रमाणे पैशाचे स्वरूपात मजूरी देण्यात येत आहे.

११. **सी.सी.टी.व्ही. कॅमेरा** :- समितीचे धान्य यार्डमध्ये शेतकऱ्यांचे शेतमालाची प्रचंड प्रमाणात आवक येत असल्याने शेतमालाची चोरी तथा सरंक्षणार्थ स्पीड डोम डिजिटल कॅमेरामध्ये सुधारणा करुन मुख्य यार्ड व सबयार्डवर नव्याने सि.सी.टी.व्ही यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्यामुळे चोऱ्यांवर नियंत्रण मिळवण्यात आलेले आहे.

१२. **बडनेरा गुरांचे यार्ड व धान्य यार्ड प्लॅटफार्म व शेडची सुविधा** :- बाजार समितीचे बडनेरा गुरांचे बाजार यार्डवर कंपाऊड वॉलचे बांधकाम, शेडचे व डब्ल्यु. बी. एम. रोड, तसेच शेतकरी भवन पिण्याचे पाण्याची सुविधा व गुरांकरीता रॅमची सुविधा इत्यादी सुविधा करण्यात आलेली आहे. तसेच बडनेरा धान्य यार्डवर कॉक्रीटीकरण, सुलभ शौचालय व मुत्रीघर व ओटे व प्लॅटफॉर्मचे बांधकाम करण्यात आलेले असून सदरची सुविधा बाजार समितीमार्फत शेतकऱ्यांकरीता करण्यात आलेली आहे.

१३. **चाळणी यंत्र** :- बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळावा या करिता व शेतमालाची प्रतवारी सुधारण्याकरीता धान्य बाजार आवारात धान्य गाळयंत्राव्दारे माफक दरात चाळणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरचे गाळणयंत्र २३ वर्ष जुने असुन कालबाह्य झालेले आहे त्यामुळे नविन अद्यावत गाळणयंत्र घेण्याबाबत समितीने ठराव पारीत केलेला असुन नविन गाळणयंत्र बसविण्यात येणार आहे.

१४. **विकास आराखडा** :- बाजार समितीने शेतकऱ्यांकरीता पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिकोणातुन तसेच बाजार समितीचा नियोजनबध्द विकास व्हावा याकरीता पुढील ०५ वर्षाकरीता करावयाच्या विकास कामांसाठी विकास आराखडा तयार केलेला आहे सदर विकास आराखड्यास मा. पणन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मंजुरात प्राप्त झालेली असुन विकास आराखड्यानुसार शेतकऱ्यांकरीता यार्डवर सुविधा उपलब्ध करण्यात येईल.

१५. **शेतकऱ्यांकरीता माफक दरात भोजन व्यवस्था** :- बाजार समितीने शेतकऱ्यांना रु. ५/- या माफक दरात भोजन व्यवस्था टि.एम.सी.यार्ड येथे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यामध्ये शेतकऱ्यांकडुन रु. ५/- नाममात्र घेण्यात येते. तसेच बाजार समितीकडुन रु. १०/- व अडत्यांकडुन प्रत्येकी रु. १०/- प्रमाणे योगदान दिल्या जाते. तसेच या व्यतीरीक्त महाराष्ट्र शासनाची शिवभोजन योजना समितीचे टि.एम.सी. यार्डवर सुरु आहे, करीता शेतकरी बंधुनी या योजनेचा लाभ घ्यावा.

१६. **आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला अर्थसहाय्य** :- आगामी काळात बाजार समितीचे निधीतुन आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला अर्थसहाय्य करण्याचा समितीचा मानस असुन शासनाची मंजुरी प्राप्त होताच अंमलबजावणी करण्यात येईल.

१७. **शेतकऱ्यांकरीता विश्रांती भवन** :- अमरावती बाजार समिती ही जिल्हास्तरीय बाजार समिती असुन या बाजार समितीमध्ये विविध तालुके, जिल्ह्यातुन तथा परराज्यातुन शेतकरी शेतमाल विक्री करीता आणतो अशा परिस्थितीत विश्रांती भवनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. बाजार समितीचे टि.एम.सी यार्डवर सदरची व्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे.

१८. **गुरे व फुले या शेतमालाचे नियमन** :- बाजार समितीचे उत्पन्न वाढीसाठी व शेतकऱ्यांना योग्य त्या सोई उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने नव्याने भातकुली उपबाजार येथे गुरांचा बाजार नियमन करण्यात आलेले आहे. तसेच दरवर्षी आमसभेत फुले उत्पादक शेतकऱ्यांची आमसभेत फुल बाजाराचे नियमन करणे संदर्भात मागणी असल्याने सदर शेतकऱ्यांची दखल घेत शासनाकडुन फुले या शेतमालाचे धान्य बाजार आवारातील

टि.एम.सी. यार्ड लगत जागेवर नियमन करण्याची मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानंतर बाजार समितीने फुले बाजारातील प्लॉट वाटपा बाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरातीस सादर केलेला आहे. मंजुरी प्राप्त झाल्यावर फुल बाजार स्थानांतरीत करण्यात येईल.

१९. **ई-नाम योजना** :- ई-नाम योजना ही केंद्र व राज्य शासनाचा महत्वकांक्षी योजना असुन ई-नाम योजनेची अंमलबजावणी आपले बाजार समितीत सुरु झालेली आहे. सदर योजनेत शेतकऱ्यांच्या शेतमालाची आवक, लिलाव, पेमेंट, इत्यादी व व्यापाऱ्यांची जावक इलेक्ट्रॉनीक पध्दतीने करण्यात येणार आहे. या करीता धान्य बाजार आवाराचे मुख्यालयात स्वतंत्र ई-नाम योजना कक्ष स्थापण करण्यात आलेले असुन त्याकरीता बाजार समितीचे निरिक्षक श्री. राजेश इंगोले यांची ई-नाम योजना प्रमुख म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत शेतमालाचे १००% आवक ई-गेट एंन्ट्रीव्दारे करण्यात येत असुन ई-बिड सुरु करण्यात आलेले आहे. या करीता सर्व अडते व खरेदीदार यांना ई-नाम पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे त्या शिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. शासनाचे आदेशान्वये लवकरच बाजारातील संपुर्ण व्यवहार ई-नाम योजनेव्दारे करण्यात येईल, या करीता सर्व अडते व व्यापारी यांचे सहकार्य अपेक्षीत आहे.

२०. **पिण्याचे पाण्याची पाणपोई :-** बाजार समितीने शेतकरी/ अडते/ खरेदीदार/ हमाल/मापारी यांचे करीता टि.एम.सी.यार्ड व धान्य यार्ड येथे एकुण १० पाणपोई उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व या व्यतीरीक्त टि.एम.सी यार्डवर अद्यावत आरओ प्लॅन्ट लाऊन पाणपोई चालु करण्यात आली आहे. चालु वर्षामध्ये नविन वाटर कुलर पाणेरीवर लावलेली आहे.

२१. **बडनेरा येथे रेशीम बाजार सुरु** :- समितीचे उपबाजार बडनेरा येथे नव्याने रेशीम या शेतमालाचे नियमन करण्यात आलेले असुन त्याठिकाणी शेतकऱ्यांना रेशीम बाजाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांचे शेतमालास योग्य बाजार भाव मिळण्यास मदत झालेली आहे व बाजार समितीचे कार्यक्षेत्रात रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना जवळच बाजार पेठ उपलब्ध झालेली आहे. तरी रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना आपला शेतमाल उपबाजार बडनेरा नवी वस्ती येथे विक्री करीता आणावा.

-स्वा-

(हरिष एकनाथराव मोरे)
सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती

समितीच्या कामकाजाबाबात अद्यावत माहीती.

१) बाजार समितीचे नांव व वर्ग	:-	कृषि उत्पन्न बाजार समीती, अमरावती वर्ग "अ****"
२) बाजार क्षेत्रात समाविष्ट तालुक्याचे नावे	:-	अमरावती व भातकुली
३) बाजार समितीची स्थापना	:-	१६ फेब्रु १८७२.
४) धान्य व कापुस बाजाराचे एकत्रीकरण	:-	दि. २० एप्रिल १९७१.
५) उपबाजारांची नावे	:-	बडनेरा, भातकुली, शिराळा, आष्टी, खोलापुर, माहुली (जहाँ.)
६) कापुस संकलन केंद्र	:-	भातकुली, शिराळा, आष्टी, खोलापुर, माहुली (जहाँ.)
७) गुरांच्या बाजाराचे नांव	:-	बडनेरा उपबाजार पेठ, बडनेरा
८) प्रमुख जनावराची आवक	:-	म्हशी, गाई, बैल, शेळ्या, घोडा
९) दुरध्वनी क्रमांक	:-	मुख्य बाजार - ०७२१-२५७२१७८,२५७२०२४,२५७११६६ फॅक्स : २५७१६११ बडनेरा (कार्या.) ०७२१-२६८१२१६ फळ व भाजीपाला (कार्या.) ०७२१- २५७२०२४
१०) ई-मेल	:-	am_amarawati@msamb.com
११) समितीने बांधकाम केलेली गोदामे	:-	१२.
१२) समितीचे कार्यक्षेत्रातील गांवांची संख्या अमरावती व भातकुली तालुका	:-	११४+१२३=२३७.
१३) समितीचे वाहन	:-	इनोवा (टोयाटो) MH २७ BE- ७७१७.
१४) समितीकडे भुईकाटे	:-	१००,८० मे. टन क्षमता प्रत्येकी एक.
१५) शेतकरी भवन	:-	शेतकरी भवन आहे.

१६) बाजार समितीमध्ये कार्यरत असलेल्या अनुज्ञाप्ती धारकांची संख्या खालीलप्रमाणे २०२५-२६ (वार्षीक)
एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत

अ.क्र.	प्रकार	धान्य	कापुस	भाजीपाला	फळे	पाने	बडनेरा धान्य	बैल बाजार	एकुण
१	अडते	३६९	४४	२५९	९०	७	१२	०	७८१
२	खरेदीदार	२८७	३६	३८	२२	०	१०	३८	४३१
३	कारखानदार	०	६	०	०	०	०	०	६
४	हमाल	१३५	०	०	०	०	३	०	१३८
५	मापारी	१९५	०	१३	४७	०	५	०	२६०
६	इतर	०	०	०	०	०	०	०	०
एकुण		**९८६**	**८६**	**३१०**	**१५९**	**७**	**३०**	**३८**	**१६१६**

१७) **बाजार समितीकडे कार्यरत असलेल्या कायम कर्मचारी संख्या :- २१**

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचे नांव	पद	मोबाईल नं.
१)	श्री. दिपक केशवराव विजयकर	सचिव/ मुख्य कार्यकारी अधिकारी	९७६४२४९८५२
२)	श्री. बी. एल. डोईफोडे	सहाय्यक सचिव	९४०४१०७२९४
३)	श्री. पी. के. पवार	सहाय्यक सचिव/ इनचार्ज फळे व भाजीपाला विभाग	९४२०७२०१०४
४)	श्री. के.एस मोरे	लेखापाल	९४२१७४१३८२
५)	श्री. धर्मराज चिचंखेडे	सांख्यिकी	७५०७४७६५६९
६)	श्री. राजेश डी. इंगोले	निरिक्षक	९४२३६४९३९०
७)	श्री. किरण साबळे	निरिक्षक	७५०७४६७५३८
८)	श्री. पी.एम. देशमुख	निरिक्षक तथा कापुस विभाग प्रमुख	९१६८४८२०००
९)	श्री. आर. पी. वानखडे	सुरक्षा अधिकारी	९४०५४३७८८७
१०)	श्री. जी. एम. पटके	निरिक्षक	९९७५४३६६५९
११)	श्री. व्ही. एम. खडसे	निरिक्षक	९४२३३१५८७३
१२)	श्री. एन एम. खानंदे	सौदेलिपीक	८३१७२६९८२८
१३)	श्री. आर. एम. राठोड	सौदेलिपीक	९७६६५७८०४२
१४)	श्री. आर. व्ही. युनाते	सौदेलिपीक	९९६०८६७३१४
१५)	श्री.अमर राठोड	क.लिपीक	९०४९७५१०९८
१६)	श्री. एन.एम.विधळे	क.लिपीक तथा इनचार्ज बडनेरा धान्य /गुरांचा बाजार	८४२१४७९२२४
१७)	श्री. एस.पी. नांदणे	क.लिपीक	९७६५६७८३३१
१८)	श्री. पी. एम. कोंडे	क.लिपीक	९७६७२३१६०५
१९)	श्री. पी.एम. साबळे	क.लिपीक	९९२३०८१२९६
२०)	श्री. एस. आर. गाढवे	शिपाई	९८९०९७६२९६
२१)	श्री. ए. डी. फुले	शिपाई	७३८५५१९१३६

स्वा
(दिपक विजयकर)
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती.

बाजार समितीचे कार्यक्षेत्र

बाजार समितीचे मुळ कार्यक्षेत्र १८७२ पासून अमरावती शहरापुरते मर्यादीत होते. सन १९७१ पासून ते जुना अमरावती तालुका म्हणजे अमरावती, भातकुली, व नांदगांव खंडेश्वर या तीन पंचायत समितीचे होते. सन १९८२ साली अमरावती, भातकुली, नांदगांव खंडेश्वर या विकासखंडाची स्वतंत्र तालुक्यात विभागणी करण्यात आली. परंतु भातकुली व अमरावती या दोन तालुका व त्याचे कार्यक्षेत्र अमरावती मुख्यालयाला व शहराला संलग्नित असुन अमरावती व भातकुली या दोन तालुक्याचे क्षेत्र समितीस लाभलेले आहे.

शेतमाल नियमन खालीलप्रमाणे

सध्यस्थितीत अमरावती बाजार समितीचे क्षेत्रात कायद्याची व नियमांची व्याप्ती खालील शेतीमाला करीता आहे.

अ.क्र.	नियंत्रीत वस्तू	अधिसुचना क्रमांक	अंमलबजावणीची तारीख
१	कापूस (सरकी काढलेला व न काढलेला)	उपलब्ध रेकार्डनुसार	१६-११-१९७२
२	गहू, ज्वारी, तूर, हरबरा, मुग, उडीद, वटाना, मसुर, बाजरी, धान, तांदूळ, मका, भुईमुंग शेंगा, (फोडलेला व न फोडलेला) जवस, तीळ, एरंडी, करडी इ.	क्र. २५३/५७९७/१०/५६	२७-१०-१९५६
३	सूर्यफूल, सोयाबीन	वि.४ कृ.उ.बा.स./ ८६०/८६दि.२४/४/८५	०१-०५-८५ १२-१२-७८
३	फळे- आंबा, केळी, लिंबू,पेरू, संत्री, सिताफळ, मोसंबी,पपई, चिकु, सेफ, द्राक्ष, बोर,टरबुज, खरबुज इ.	सि. एम. आर/आर	१७-१२-७८
५	चटण्या मसाल्याचे पदार्थ मिरची (ओली व वाळलेली)हळद, अद्रक, लसन, मेथी जीरे, धनिया, राई, विड्याची पाने	सि.एम. आर/आर	९-४-८७
६	आलू, कांदे, टोमॅटो, रतालु, पालेभाज्या	सि.एम.आर/आर	९-४-८७
७	जनावरे बाजार — गाई,म्हशी,बैल,शेळी,मेंढी व कोंबड्या		६-४-९०
८	फुल बाजार सर्व प्रकारची फुले	जिउनिअम/पणन-१ अधिसुचना-४८०४	१८/१२/२०२०
९	रेशिम	जिउनिअम/पणन-१ अधिसुचना-४८०४	१८/१२/२०२०

अमरावती बाजार समितीचे मुख्य व दुय्यम बाजार आवाराची माहिती

मुख्य बाजार आवार -

धान्य व कापुस बाजार जुने यार्डवर एकाच आवारावर कार्यरत असल्यामुळे गर्दी होत होती, म्हणून समितीने विदर्भ महाविद्यालयाचे लगत व जिनींग प्रेसिंगचे परिसराला लागून असलेल्या शासकीय १८ एकर १७ गुंठे जागेची शासनाकडे मागणी केली. शासनाने ही जागा २३ जून १९६६ रोजी समितीस कायम लिजवर मंजुर केली आहे. दि.०७/११/१९७२ पासून कापुस या शेतीमालाचे व्यवहार या आवारावर स्थलांतरीत करण्यात आले. समितीने याच आवारास लागून असलेली शासकीय ३ एकर २ गुंठे जागा विस्ताराकरीता शासनाकडे मागणी केली असता शासनाने ही जागा रू. १.४० प्रति चौ. फूट या दराने समितीस कायम लिजवर मंजुर केली. सदरचे आवारावर कापूस या शेतीमालाचे नियमन करण्यात येत असल्यामूळे यास नविन कापूस बाजार म्हणुन संबोधण्यात येते. जुने कापूस बाजार आवारावर धान्याची व्याप्ती वाढल्यामुळे गर्दी होत होती म्हणुन समितीने या कापुस नविन आवारावर धान्य बाजार स्थलांतरीत करण्याचे ठरविले होते. त्याकरीता विकास आराखडा तयार करून घेऊन त्यास मा. पणन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मंजुरात प्रदान करून घेतली आहे. त्या आराखड्या नुसार बांधकाम करण्यात येऊन तेथेच धान्य बाजार दि.०१/१०/१९९८ पासुन स्थलांतरीत करण्यात आला. सद्यस्थितीत धान्य बाजार हेच समितीचे मुख्यालय आहे. याच यार्डला लागुन कापुस बाजाराकरीता ५ एकर १० गुंठे जमीन खरेदी केलेली असुन त्यास समितीने टि.एम.सी. यार्ड म्हणून घोषित केलेले असुन सदर यार्डवर कापसाचे व्यवहार होतात.

जुने कापूस बाजार आवार- (फळ व भाजीपाला विभाग)

शहराच्या मध्यवस्तीत सदर बाजार आवार आहे. त्याचे क्षेत्र ८ एकर १४ गुंठेचे आहे सन १८७२ पासून ही जागा शासनाकडुन कायम पट्टयाने मिळालेली असुन त्या जागेवर कापूस बाजाराचे नियंत्रण करण्यात येत होते. म्हणून यास जुने कापुस बाजार आवार म्हणून संबोधल्या जाते. सन १९७८ पासून या आवारावर फळांचे व्यवहार सुध्दा सुरू करण्यात आले आहे. तसेच १९९८ पासुन भाजीपाला (आलू, कांदे, मिर्ची व इतर भाजीपाला) इ. व्यवहार याच यार्ड वर करण्यात येतात. लिलावासाठी ओटे, शेड्स काँक्रीट, प्लॅटफार्म, अडत्या, करीता दुकाने, गोदाम, व्यवस्था, पिण्याचे पाण्याची व्यवस्था, सॅनिटरी, अरेन्जमेंट, ड्रेनेज, फायर फायटिंग पोस्ट, ऑफीस, बँका व शेतकरी भवन इ. व्यवस्था केलेल्या आहेत.

उपबाजार आवार :- समितीचे एकूण ८ उपबाजार आहेत.

१) बडनेरा धान्य/ रेशिम उपबाजार-

बाजार समितीची नवी वस्ती बडनेरा येथे ४.३० एकर जागा आहे. त्या ठिकाणी समितीने धान्य बाजाराचे नियमन केलेले असुन सद्यस्थितीत बाजार सुरु आहे.

२) बडनेरा गुरांचा उपबाजार-

दि.०६/०४/१९९० पासून बडनेरा येथे गुरांचे बाजाराचे नियमन केलेले असुन दर शुक्रवारी गुरांचा बाजार भरतो. समितीने या आवारावर कार्यालय, लिलावभवन, शेड्स, विद्युत व्यवस्था, सुलभ शौचालय, पिण्याचे पाणी, CCTV यंत्रणा इ. व्यवस्था केलेल्या आहेत.

३) भातकुली -

येथे समितीस शासनाकडून ९ एकर १३ गुठे जागा कायम लिजवर मिळाली असुन कापुस या शेतमालाचे नियमन करण्यात येते. या ठिकाणी समितीचे कार्यालय, लिलावभवन तसेच कंपाऊड, पाण्याची, विद्युतची व्यवस्था सॅनीटरी अरेंजमेंट इ. व्यवस्था केलेल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांचा माल ठेवून तारणाची सोय उपलब्ध करून

देण्याच्या दृष्टीने ग्रामीण योजनेअंतर्गत २०० में टन क्षमतेच गोदामाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच नव्याने गुरांचे बाजाराचे नियमन केलेले असुन लवकरच गुरांचा बाजार सुरु होणार आहे.

४) आष्टी :-

येथे समितीचे मालकीची ८ एकर जागा असून या आवारावर, कार्यालयाची इमारत, लिलावभवन, शेतमालाचे लिलावची व्यवस्था, करण्यात आली होती. परंतु सदरच्या इमारती जिर्ण झाल्या असुन डिसमेंटल करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा माल ठेवून तारणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रामिण गोदाम योजनेअंतर्गत २०० मे. टन क्षमतेचे गोदामाचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

५) शिराळा :-

येथे समितीची ७.५ एक जागा असून तेथे या आवारावर कार्यालयाची इमारत , गोदाम, पाण्याची व्यवस्था, इलेक्ट्रीक, लिलावभवन, रोड्स इ. व्यवस्था उपलब्ध आहे. परंतु जुण्या इमारती जिर्ण झाल्या असुन डिसमेंटल करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांचा माल ठेवून तारण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रामिण गोदाम योजनेअंतर्गत २०० मे. टन. क्षमतेचे गोदामाचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

६) भातकुली रोड (भाजी बाजार) :-

येथील जागा समितीने भातकुली रोड, अमरावती येथे खरेदी केलेली असून प्रामुख्याने त्या परिसरातील हिरवा भाजीपालाचे नियमन केलेले असून तेथे जुने यार्डवरील भाजीपाल्याचे व्यवहार स्थांनातरीत करण्याचा समितीचा मानस आहे. या आवारास तारेचे कंपाऊड, कार्यालयाची इमारत, पाण्याची व्यवस्था, इलेक्ट्रीक लिलावभवन, रोड इ. व्यवस्था उपलब्ध आहे. भविष्यात फुल बाजाराकरीता जागा कमी पडल्यास फुल बाजार स्थानांतरीत समितीचा मानस आहे.

७) माहुली जहाँगीर :-

समितीचे कार्यक्षेत्रात सन १९८९-९० मध्ये माहोली येथे कापूस संकलन केन्द्र मंजूर झालेले आहे. तेथे समितीने स्वत:च्या मालकीची ८ एकर जागा खरेदी केली असून कापूस केंद्राकरीता तात्पुरत्या स्वरूपाच्या प्राथमिक सोई उपलब्ध करून दिल्या आहेत. या ठिकाणी संत्रा या शेतमालाकरीता बाजार पेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातुन पायाभुत सुविधा उपलब्ध करुन संत्रा करीता स्वतंत्र बाजार चालु करण्यात येणार आहे.

८) खोलापूर :-

खोलापूर येथे सन १९८९-९० सालात कापूस संकलन केंद्र मंजूर झाले असून समितीचे मालकी हक्काची ८ एकर जागा घेवून तात्पुरत्या सोई उपलब्ध केल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांचा माल ठेवून तारण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रामिण गोदाम योजनेअंतर्गत २०० मे. टन क्षमतेचे गोदामाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. या ठिकाणी गुरांच्या बाजाराच्या नियमनाकरीता पायाभुत सुविधा उपलब्ध करण्यात येणार असुन या ठिकाणी संरक्षणभिंत तसेच कार्यालय, शेतकरी भवन इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

कापुस प्रक्रिया संस्था (जिनींग प्रेसिंग फॅक्टरी)

कार्यक्षेत्रात कपाशीवर प्रक्रिया करणाऱ्या खालील प्रमाणे प्रमुख ११ जिनिंग प्रेसींग आहेत.

१) एदलजी जिन २) लड्ढा जिन ३) नेमानी जिन ४) दिपक उद्योग ५) गंगा कॉट फायबर ६) गजानन कॉटेक्स, ७) संजिवनी जिनींग ॲन्ड प्रेसींग ८) श्री महालक्ष्मी जिनिंग प्रेसींग फॅक्टरी ९) अमरावती खरेदी विक्री संस्थेचा सोसायटी जिन १०) लकी जिनिंग प्रेसींग आहेत.

बँकींग व्यवस्था :-

